ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पाहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 58.

वर्ष ३१ | पुणें, बुधवार, २० जानेवारी, १९६५ | अंक २

## नहीं—
## यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुवदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं : १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र | घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७१ कारखाना : ४०८१२

# विविध माहिती

**परदेशीय तंत्रज्ञांच्या सहकार्याबद्दल इशारा**—परदेशांतील तंत्रज्ञांकडून भारताच्या औद्योगिक उभारणीसाठी घेण्यांत येणाऱ्या सहकार्याबद्दल कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संघटनेचे सरसंचालक डॉ. हुसेन झहीर ह्यांनीं सावधगिरीचा इशारा दिला आहे. ते म्हणाले कीं, परदेशांत निरुपयोगी ठरलेल्या उत्पादन तंत्राचीं भारतात आयात झाल्याचीं कांहीं उदाहरणें घडलीं आहेत. असा प्रकार होणें राष्ट्रीय हिताचें नाहीं. परदेशांतील तंत्रज्ञांच्या तोडीचें तंत्रज्ञान भारतांत उपलब्ध असतांनाहि तें न वापरतां परदेशी तांत्रिक सहकार्य घेणें धोक्याचें आहे. भारतानें आपलें स्वतःचें तंत्रज्ञान निर्माण करणें अगत्याचें आहे.

**चंदनाच्या निर्यातीवर निर्बंध**—चंदनाच्या लाकडाच्या निर्यातीवर कमाल मर्यादेचे निर्बंध घालण्याची शिफारस करण्यांत आली आहे. चंदनाच्या लाकडाला परदेशांत वाढती मागणी येत आहे. चंदनाच्या कृत्रिम तेलाची स्पर्धा असूनहि ही मागणी फुगत चालली आहे. १९६३–६४ सालांत मद्रास सरकारच्या जंगलखात्यानें १,३८५ टन चंदनी लाकडाची विक्री केली. त्यापासून राज्याला ८० लाख रुपयांचें उत्पन्न मिळालें. मद्रास राज्याला जंगल खात्यापासून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नाच्या एक तृतीयांश एवढें हें उत्पन्न आहे.

**अधिकाधिक सोनार धंदा सोडूं लागले**—सुवर्णनियंत्रणाची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून अधिकाधिक सुवर्णकार हा धंदा सोडून जात आहेत. नियंत्रणापूर्वी त्यांना जितकी बरकत होत असे, तितकी आतां होत नाहीं. पुनर्वसनासाठी सरकारी मदत मागणाऱ्या सोनारांची संख्या अर्थातच वाढत आहे. गेल्या महिन्यांत मदत घेतलेल्यांची संख्या ५५ हजार होती. ती आतां ६२ हजारांपर्यंत आली आहे. सुवर्णकार आपले परवाने परत करीत आहेत.

**गोवा येथें नाविक तळ**—गोवा येथें हिंदी नाविक दलाचा नवीन तळ उभारण्याच्या दृष्टीनें पावलें टाकण्यांत येत आहेत. तळासाठी लागणारी जागा अधिक प्रमाणांत मिळविण्यांत आली आहे. मार्मागोवा येथील बोटी बांधण्याच्या कारखान्याचा विस्तार करण्यांत यावयाचा आहे. नव्या बोटी समुद्रांत सोडण्यासाठी लागणारे दोन उतरते धक्के बांधण्यांत येत आहेत. ते चालू वर्षाच्या अखेर पुरे होतील.

**संततिप्रतिबंधक साधनांचा नाश**—बिहारच्या माहिती आणि कुटुंबनियोजन खात्याच्या मंत्री श्रीमती सुमित्रादेवी ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, खात्यातर्फे पुरविण्यांत येणाऱ्या ७ हजार संततिप्रतिबंधक साधनांचा नाश करावा लागला. कारण ती घेण्यासाठी लोक पुढेंच आले नाहींत. बिहार राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कुटुंबनियोजनासाठी १६ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. परंतु त्यांपैकी फक्त २ लाख रुपयेच खर्च झालेले आहेत.

**पोस्ट खात्याच्या कामाचा व्याप**—भारताचें पोस्टखातें रोज २ कोटी पत्रांचा, ४ लाख तारांचा आणि २ लाख पार्सलांचा बटवडा करते. सध्यां देशांत ९२ हजार पोस्टाच्या कचेऱ्या आहेत. ब्रिटिश राजवटींत त्यांची संख्या अवघी २२ हजार होती. देशांतील टेलिफोन्सची संख्या ७ लाख आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस पोस्ट ऑफिसांची संख्या १ लाखाच्या आसपास जाईल.

**श्रीनगरचें सौंदर्यवर्धन**—काश्मीरच्या सरकारनें श्रीनगरच्या सौंदर्यवर्धनाची एक योजना आखली आहे. योजनेसाठी एकूण १ कोटी रुपये खर्च होणार आहेत. त्यांपैकी १५ लाख रुपये चालू वर्षांत खर्च करण्यांत येतील. शहरांत अनेक बागबगीचे तयार करण्यांत येणार असून त्यांपैकी एक खास मुलांच्यासाठी असेल. शहराच्या सांडपाण्याच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें गलिच्छ वस्त्याहि नाहींशा करण्यांत येतील.

**गलिच्छ वस्त्यांचें निर्मूलन**—राजकोट शहरांतील गलिच्छ वस्त्यांचें निर्मूलन करण्याची योजना तेथील नगरपालिकेनें हातीं घेतली आहे. ह्या योजनेसाठी एकूण ७·६७ लाख रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकी ३·१९ लाख रुपये मध्यवर्ती सरकार मदतीदाखल देणार आहे. गलिच्छ वस्त्यांत राहणाऱ्या लोकांची राहण्याची सोय करण्यासाठी १६६ बिऱ्हाडें बांधण्यांत येणार आहेत.

**अमेरिकेची साखरेची आयात**—१९६५ च्या पहिल्या तीन महिन्यांत परदेशांतून ४ लाख, ५३ हजार टन साखर आयात करण्याची परवानगी अमेरिकेच्या शेतकी खात्यानें दिली आहे. त्यांपैकी अवघी ११ हजार, ९९५ टन साखर भारताकडून आयात केली जाणार आहे.

**स्वस्त किंमतीचीं पाठ्यपुस्तकें**—विद्यार्थ्यांना स्वस्त किंमतींत पाठ्यपुस्तकें देण्यासाठी ब्रिटननें एक प्रकाशन योजना चालविलेली आहे. त्यांपैकीं १०० वें प्रकाशन नुकतेंच प्रसिद्ध करण्यात आलें. भारत व इतर अनेक अविकसित देशांतील गरीब विद्यार्थ्यांना ह्या पुस्तकांचा फार फायदा होतो. योजनेखालीं पाठ्यपुस्तकांच्या व इतर सर्वसामान्य पुस्तकांच्या ३० लाख प्रती काढण्यांत आल्या आहेत. त्यांची किंमत ब्रिटनमधील किंमतीच्या एक तृतीयांश आहे. पुस्तकें विद्यापीठांतील अभ्यासक्रमाचीं आहेत.

**आसामशीं दळणवळणाची सोय**—आसाम राज्याशीं दळणवळण ठेवण्यासाठी लघुलहरविर चालणारी टेलिकॉम पद्धति अवलंबिण्यांत येणार आहे. भारतांत अशा प्रकारची दळणवळणाची योजना प्रथमच उभारण्यांत येत आहे. ह्या कामासाठी लागणारे पोलादी मनोरे जपानकडून मिळविण्यांत येणार आहेत. संपूर्ण योजनेसाठी १०५ कोटी रुपये खर्च येणार आहे. १९६५ अखेर योजना पूर्ण होईल.

**चीनची प्रगत विमानविद्या**—ध्वनीपेक्षाहि अधिक गतीनें उड्डाण करणारीं लढाऊ विमानें चीन आपल्या कारखान्यांत तयार करूं लागला आहे. १९६१ सालीं चीन व रशिया ह्यांचे संबंध बिघडले त्यापूर्वी रशियानें चीनला अशीं कांहीं विमानें दिलीं होतीं. परंतु तीं जुनींपुराणीं झालेलीं आहेत. अलीकडे मात्र चीनच्या हवाईदलांत अत्याधुनिक लढाऊ विमानें दिसूं लागलीं आहेत.

**कुटुंबनियोजनाला अग्रहक्क**—मध्यप्रदेश सरकारच्या आरोग्यखात्यानें कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला अग्रहक्क देण्याचें ठरविलें आहे. राज्यांतील सर्व जिल्ह्यांत आतां संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्याची सोय उपलब्ध करण्यांत आली आहे. १९६३–६४ सालांत राज्यांत अशा २५ हजार शस्त्रक्रिया करण्यांत आल्या. चालू वर्षांत ७६ हजार शस्त्रक्रिया होतील असा अंदाज आहे.

# अर्थ

बुधवार, २० जानेवारी, १९६५



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## श्री. मेहता ह्यांचें सडेतोड विचारप्रदर्शन

मुंबई येथील रोटरी क्लबमध्यें बोलतांना श्री. गगनविहारी मेहता ह्यांनीं सध्यांच्या आर्थिक नियोजनांतील उणीवाविषयीं आपले विचार सडेतोडपणानें व्यक्त केले आहेत. नव्या वर्षाच्या प्रारंभ-प्रसंगीं ते बोलत होते. ते म्हणाले कीं सध्यां सगळीकडे योजना व प्रकल्प ह्यांची गर्दी झालेली आहे. राज्यकर्ते, कायदेमंडळाचे सभासद, उद्योगपति आणि सत्ता व संपत्तीचा पाठलाग करणारे असे सर्वच जण सामान्य माणसाच्या हिताच्या गोष्टी बोलत आहेत. हा सामान्य माणूस कोठें आहे आणि त्याला काय वाटतें ह्याचा मात्र पत्ता नाहीं. आर्थिक विकास हा उद्दिष्ट ठरवून, राष्ट्रीय गुंतवणुकीचे अगडबंब आकडे जाहीर करून अगर मोठाले खर्च करून होईल अशी समजूत असेल तर ती भ्रामक आहे. समाजवाद काय अगर खाजगी उद्योगधंदे काय, नुसत्या श्रद्धेवर यशस्वी होत नाहींत. जुनीं–पुराणीं घोषवाक्यें अगर परदेशांतील साचेबंद शब्द-प्रयोग ह्यांचा वारंवार उच्चार करूनहि तो होणार नाहीं. त्यासाठी कल्पनाशक्ति, पुढाकार घेण्याची वृत्ति, निश्चय आणि जबरदस्त कष्ट ह्यांची आवश्यकता आहे. कल्पकता, साहसाची वृत्ति आणि सहकाराची भावना हीं कर्जाऊ मिळण्यासारखी नाहींत. त्यांची निर्मिति आणि विकास येथेंच झाला पाहिजे. सध्यांच्या भडकलेल्या किंमतीमुळें सामान्य माणसाला जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें अशक्य झालेलें आहे. म्हणून त्याच्या अन्नाच्या व इतर प्राथमिक गरजा भागविण्यास प्राधान्य देण्यांत आलें पाहिजे. कितीहि परदेशीय मदत मिळाली तरी वेदना निर्माण करणारे निर्णय घेण्याचे टाळतां येणार नाहीं. कारण, सामाजिक आणि आर्थिक विकास हा यांत्रिक अगर स्वयंचलित मार्गानें साध्य होत नाहीं. समाजाच्या हितासाठी सांघिक रीत्या कामें करण्याची संधि नियोजनानें लोकांना मिळवून दिली पाहिजे.

---

## डॉक्टरांच्या परदेशगमनावरील कडक निर्बंध

भारतामधील डॉक्टर्समध्यें परदेशांत जाण्याचें आकर्षण वाढत्या प्रमाणांत आढळून येत आहे. ह्या प्रवृत्तीला पायबंद घालण्याच्या हेतूनें भारत सरकारच्या आरोग्य खात्यानें त्यांच्या परदेशगमनावरील निर्बंध अधिक कडक करण्याचें ठरविलें आहे. सुमारें वर्षापूर्वी घेण्यांत आलेल्या निर्णयाप्रमाणें एम. डी. अगर एम्. एस. सारख्या पदवीच्यानंतरचा अभ्यासक्रम पार पाडलेल्या डॉक्टरांनाच अधिक विद्यार्जनासाठीं अगर नौकरीसाठी परदेशांत जाण्याचा परवाना दिला जाई. साध्या एम. बी. बी. एस. डॉक्टरला परदेशांत जावयाचें असेल तर त्यानें त्या परीक्षेंत पहिला वर्ग मिळविलेला असला पाहिजे, आणि शिवाय तीन वर्षें अनुभव मिळविलेला असला पाहिजे असें बंधन होतें. केवळ पास झालेल्या डॉक्टराला तर ७ वर्षांच्या अनुभवाची अट होती. तथापि, सरकारी नौकर नसलेल्या डॉक्टरांच्या नौकरीसाठी होणाऱ्या परदेशगमनाबाबत हे निर्बंध लागू नव्हते. ह्या नियमाप्रमाणें डॉक्टर्सना पासपोर्ट देण्याचें काम चालत असे. परंतु लंडनमधील इंडिअन हायकमिशनकडून आलेल्या माहितीप्रमाणें अलीकडे भारतांतून नौकरीसाठी ब्रिटनला जाऊं इच्छिणारांच्या संख्येंत वाढ झालेली आहे. हे डॉक्टर्स बहुधा तरुणच असतात. ह्या चिंताजनक परिस्थितीचा विचार करून भारत सरकारनें अधिक अभ्यासासाठी परदेशांत जाण्याची इच्छा करणाऱ्या व नौकरीसाठी परदेशांत जाऊं इच्छिणाऱ्या डॉक्टर्सना परवाने देण्याबाबत जो फरक करण्यांत येत असे तो रद्द करण्याचें ठरविलें आहे. गेल्या कांहीं महिन्यांत विद्यार्जनासाठी अगर नौकरीसाठी परदेशांत जाण्याचे परवाने मिळविण्यासाठी २०० डॉक्टर्सचे अर्ज आले. आतां खाजगी रीत्या नौकरीसाठी परदेशास जाऊं इच्छिणाऱ्या डॉक्टरांनाहि अनुभवाबाबतचे नियम पाळावे लागणार आहेत.

---

## जातिनिष्ठा अजूनहि जोरकस आहे

हिंदुस्थानांतील सामाजिक जीवनांत जातिनिष्ठा अजूनहि प्रबल असल्याचें सांगण्यांत येतें. औद्योगिक क्रांतीच्या आगमनानें हे परंपरागत भेद मावळले आहेत अगर मावळत चालले आहेत, असाहि दावा करण्यांत येतो. इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲड-मिनिस्ट्रेशन ह्या संघटनेतर्फे ‘ बदलत्या भारतामधील जातिसंस्था ’ ह्याविषयीं एक अभ्यासग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यांतील निष्कर्ष असा : भारत स्वतंत्र झाल्यापासून ज्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय शक्ति निर्माण झाल्या त्यांच्या दडपणामुळें जातिनिष्ठेवर आधारलेल्या सामाजिक श्रेणींत सूक्ष्म बदल झालेले आहेत. परंतु, हिंदी समाजांत आणि राजकारणांत जातिनिष्ठा ही अजूनहि एक जोरकस प्रवृत्ति आहे. गेल्या कांहीं वर्षांत जाति व भाषा ह्यांच्यावर आधारलेले गट आधिक्यानें अस्तित्वांत आलेले आहेत. हे गट सामाजिक जीवनांत दडपण आणतात. आधुनिक औद्योगिक प्रगतीमुळें खाणेंपिणें व इतर कांहीं बाबी ह्याविषयींचे जातींवर आधारित विधिनिषेध मोडकळीस येत आहेत. परंतु, त्याबरोबर आर्थिक व सामाजिक प्रगतीचे फायदे पदरांत पाडून घेण्यासाठी जातीवर भर देणाऱ्या संघटनाहि उभारल्या जात आहेत. जातिनिष्ठ विचार आणि आचार करण्याच्या प्रवृत्ति राज्य, जिल्हा आणि पंचायत पातळींवरहि दिसून येतात. वयांत आलेल्या माणसाला मताधिकार प्राप्त झाल्यापासून ही गोष्ट विशेष स्पष्टपणें दिसून येत आहे. राज्यघटनेंत जातिभेदावर आधारलेल्या उच्चनीचपणाच्या कल्पनांना मूठमाती देण्यांत आलेली असली, तरी त्याच घटनेंत कांहीं विशिष्ट जातींच्या लोकांना खास सवलती बहाल करण्यांत आल्या आहेत. ह्या तरतुदी कांहींशा परस्परविरोधी आहेत. हिंदी समाजांतील जातीवर अधिष्ठित असलेल्या जातिवादाची जागा आतां धर्मावर आधारलेला जातिवाद घेत आहे.

---

## हिंदुस्थान अँटीबायॉटिक्स लि.

पेनिसिलिन, टेट्रॉसायक्लिन, स्ट्रेप्टोमायसिन, ह्या औषधांचें उत्पादन करणाऱ्या ह्या सरकारी कंपनीनें स्वतःच्या उत्कृष्ट कामगिरीनें सरकारी मालकीच्या कारखानदारीची बूज राखली आहे. कंपनीच्या प्रगतीचा तपशील खाली दिला आहे—

प्रगति : १९६०–६१ ते १९६३–६४

| | १९६०–६१ | १९६१–६२ | १९६२–६३ | १९६३–६४ |
|---|---|---|---|---|
| उत्पादन ( नियोजित ) | | | ५०·०० | ५२·०० |
| द. ल. मे. यु. | ३५·०० | ४५·०० | | |
| ( प्रत्यक्ष ) | | | ५०·१७ | ५१·५४ |
| द. ल. मे. यु. | ४०·२४ | ४५·५३ | | |
| विक्री ( लक्ष रु. ) | ३४३ | ३५६ | ४३० | ४८२ |
| नफा ( लक्ष रु., करापूर्वी ) | १४६ | १४० | १४० | १४५ |
| कराची तरतूद ( लक्ष रु. ) | ६५ | ६४ | ७० | ७० |
| डिव्हिडंड ( लक्ष रु. ) | — | १६ | १६ | २५ |
| कामगारांची संख्या | १२०५ | १४१२ | १८१८ | १८९२ |

कंपनीला सरकारचें, बँकेचें किंवा इतर कुणाचेंहि कर्ज देणें नाहीं. भांडवली स्वरूपाच्या जिंदगींत गुंतलेल्या रकमेपेक्षा तिचे स्वतःचें भांडवल (वसूल भाग भांडवल + रिझर्व्हज) २९४ लक्ष रुपयांनीं जास्त आहे. ह्याचा अर्थ खेळत्या भांडवलाचा पुरवठा कंपनी स्वतःच्या मालकीच्या भांडवलांतूनच करूं शकते. कंपनीला विक्रीवर ३०%फायदा उरतो; तेव्हां तिच्या औषधांच्या किंमती आणखी खाली येण्यास हरकत नाहीं. कंपनीच्या स्ट्रेप्टोमायसिनची किंमत किलोग्रॅमला १७५ रु. ठेवण्यांत आली आहे. वास्तविक त्याच्या उत्पादनाचा खर्च त्यापेक्षा ज्यास्त आहे. आयात स्ट्रेप्टोमायसिन ज्या दरानें विकलें जात होतें, त्यापेक्षा जास्त दर गिऱ्हाइकाला देऊं लागूं नये, हा त्याचा उद्देश. ह्याचा अर्थ, पेनिसिलिन घेणारांना स्ट्रेप्टोमायसिनची किंमत कमी राखण्यासाठी खंडणी द्यावी लागते.

भारत सरकारनें स्ट्रेप्टोमायसिनच्या उत्पादनशक्तींत वाढ करण्यासाठी सामग्रीच्या आयातीला परदेशी हुंडणावळ मंजूर केली, तेव्हां १९६२–६३ आणि १९६३–६४ मध्यें मिळून कंपनीनें ३४ लक्ष रुपयांचें पेनिसिलिन आणि स्ट्रेप्टोमायसिन निर्गत केलें पाहिजे, अशी अट घातली होती. परंतु, अँटिबायोटिक्स औषधांची भारताबाहेरील किंमत कंपनीच्या उत्पादनखर्चापेक्षाहि कमी असल्यानें कंपनीला ती अट पाळतां आलेली नाहीं. आपली किंमत उतरवून निर्गत शक्य करण्यासाठी कंपनीनें वरील दोन्ही वर्षी दरसाल ८·५०लक्ष रु. नफ्यांतून "निर्गतीसाठी गंगाजळी"त टाकले. ह्याचा अर्थ, ३४ लक्ष रुपयांच्या परदेशी हुंडणावळीच्या प्राप्तीसाठी ५१ लक्ष रु. कंपनीला खर्च आला आहे.

## वानरांच्या भाषेचा शब्दकोश

आपला भाव व्यक्त करण्यासाठी पशु तोंडाचे हावभाव आणि आवाज करीत असतात. केंब्रिजशायर (इंग्लंड) मधील २५ वानरांचे हावभाव आणि आवाज अभ्यासून त्यांचे अर्थ लावण्यांत आले आहेत आणि त्यांच्या भाषेचा शब्दकोश रचण्यांत आला आहे. सुमारें चार वर्षांच्या अभ्यासाचा हा परिपाक आहे. सुर्ते ३० प्रकारचे आवाज आणि ३० प्रकारचे हावभाव ह्यांचा अर्थ इंग्रजी भाषेत सांगण्यांत आला आहे. आतां अधिक तपशीलांत जाऊन अधिक सूक्ष्म अर्थहि सांगतां येणें शक्य होईल. मेडिकल रीसर्च कौन्सिलनें ह्या अभ्यासाला साहाय्य केलें आहे.

## चीन अग्निबाण बनविण्याच्या प्रयत्नांत आहे

चीन केवळ अणुबॉंबच्या निर्मितीवरच थांबलेला नसून अग्निबाणांच्या साह्यानें लष्करीदृष्ट्या आणखी प्रबळ होण्याच्या खटपटींत आहे. गेल्या कांहीं वर्षांत चीननें ब्रिटन, फ्रान्स, झेकोस्लोव्हाकिआ, जर्मनी व जपान ह्या देशांकडून अद्यावत् पद्धतीचीं अतिसूक्ष्म उपकरणें आयात केलेलीं आहेत. त्यांचा उपयोग करून, थोड्या अंतरावर फेंकतां येण्यासारखे व मध्यम प्रतीचे अग्निबाण तयार करण्याच्या खटपटी चीन करीत आहे. नुसता अणुबॉंब बनवून कांहीं उपयोग नाहीं; तो वाहून इच्छित स्थळीं टाकूं शकणारे अग्निबाण नसतील तर अणुबॉंब असून नसून सारखाच ह्याची चिनी राज्यकर्त्यांना जाणीव आहे. येत्या तीन–चार वर्षांच्या कालांत चीन अग्निबाणविज्ञानांत प्रगति करील असा इषारा अमेरिकेंतील एका चिनी शास्त्रज्ञानें दिला आहे.

## घरच्या गरजा आधीं भागवा

मद्रास येथें हिंदुस्थान चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेनें केलेल्या स्वागत समारंभ प्रसंगीं बोलतांना उद्योगपति श्री. जी. डी. बिर्ला म्हणाले कीं, घरच्या बाजारपेठेच्या गरजा पूर्णपणें भागविल्याशिवाय निर्यात करण्याची भाषा करणें मूर्खपणाचें आहे. एखाद्या देशांत जें उत्पादन होतें त्यांतीलच कांहीं माल निर्यात केल्यानें त्या देशाची भरभराट होते असें नाहीं. भारतामधील उद्योगपतींनीं अमेरिका व ब्रिटनमधील उद्योगधंद्यांचीं उदाहरणें डोळ्यांसमोर ठेवावीत. ब्रिटनमधील व अमेरिकेंतील उद्योगपति केवळ पैसा मिळविण्याचें ध्येय नजरेसमोर ठेवीत नाहींत. तो त्यांचा प्रमुख हेतु नसतो. मालाचें उत्पादन आणि रोजगारीच्या संधि निर्माण करणें ह्याकडे ते अधिक लक्ष देतात.

## दंतवैद्यकशास्त्रांतील नवा शोध

पॅरिस येथें भरलेल्या दंतवैद्यांच्या परिषदेंत कृत्रिम दांत बसविण्याच्या एका नव्या पद्धतीची माहिती देण्यांत आली. सध्यां प्रचलित असणाऱ्या पद्धतीनें ज्यांना कृत्रिम दांत नीट बसत नाहींत त्यांना ह्या नव्या पद्धतीचा विशेष फायदा होईल. नव्या पद्धतींत रोग्याच्या हिरडीवर कांहींशी गुंतागुंतीची शस्त्रक्रिया करण्यांत येऊन ती मागें सारण्यांत येते आणि मग जबड्याच्या हाडावरच नवीन दांत पक्का करण्यांत येतो; अगर जबड्याच्या हाडावर धातूची पट्टी बसविण्यांत येऊन त्यावर दांत बसविण्यांत येतो. हिरडीवरील शस्त्रक्रिया करण्यासाठी रोग्याला सुमारें दोन दिवस इस्पितळांत राहावें लागतें. ही नवीन पद्धत कृत्रिम दांतासंबंधींच्या अमेरिकन वैद्यकीय संघटनेच्या अध्यक्षांनीं शोधून काढली आहे. पॅरिस येथील परिषदेला ३३ देशांचे प्रतिनिधि आले होते.

## बोलण्यावर नियंत्रण ठेवणारें घड्याळ

प. जर्मनीच्या टपाल खात्याच्या मंत्र्यानें भाषणाचें नियंत्रण करणारें एक घड्याळ बनविलें आहे. वाळूच्या घड्याळाच्या तत्त्वावर तें आधारलेलें आहे. त्याला चार कप्पे आहेत. प्रत्येक वरच्या कप्प्यांतून खालच्या कप्प्यांत वाळू गळायला ३ मिनिटें लागतात. पहिल्या कप्प्यावर लिहिलें आहे, "विषयाची प्रस्तावना" दुसऱ्या कप्प्यावर लिहिलें आहे, "मुद्दा सोडून बोलूं नका" तिसऱ्यावर लिहिलें आहे, "आटोपतें घ्या" आणि चवथ्यावर लिहिलें आहे, "समाप्त". प्रत्येक मंत्र्याला हें घड्याळ दिलें जाईल. मंत्र्याच्या भेटीला येणाराला तें त्याच्या वेळाचें मार्गदर्शन करील. मुलाखत १२ मिनिटांत संपली पाहिजे, हें त्याला कळून चुकून त्याचें बोलणें आपोआप मर्यादित होईल.

## आर्थिक समाजधुरीण के. प्रोफेसर काळे

**(श्री. वी. ना. क्षीरसागर, माजी डायरेक्टर, दि भारत इंडस्ट्रिअल बँक, इंडस्ट्रीज् कन्सलटंट, पुणें २, यांची आदरांजलि)**

महाराष्ट्राचे ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञ व ब्रिटिश अमदानींतील टॅरिफबोर्डाचे सदस्य के. वामनरावजी काळे यांच्या मृत्यूस दि. २७ रोजीं १९ वर्षे पूर्ण होतील. त्यांच्या पुण्यस्मरणार्थ त्यांच्या बहुविध कार्यापैकीं कांहीं कार्यांत माझा सन १९२८ ते १९३८ या कालखंडांतील सुमारें १०–११ वर्षे सहवासाचा, मार्गदर्शनाचा व प्रसंगोचित त्यांचे समवेत कार्य करण्याचा सुयोग लाभला. त्यांतील कांहीं आठवणी ह्या प्रसंगानें ग्रथित करीत आहे. या आठवणींतील त्यांची कार्यपद्धति, अचूक दूरदृष्टि, कामणुकींतील प्रसंगोपात्त कणखर वृत्ति व कार्यकर्त्यांना आपलेबरोबर पुढें नेण्याची हातोटी हे जे समाजधुरीणाच्या अंगीं महत्त्वाचे गुण लागतात ते त्यांचे ठिकाणीं कसे वसत होते हें दिसून येईल.

### १. शहरी व ग्रामीण भागाचा समन्वय

सहकारी चळवळीशीं के. दादासाहेब यांचा बरीच वर्षे संबंध होता. सहकारी बँका, सोसायट्या व ग्रामीण भागांतील सहकारी संस्था यांच्या कार्यपद्धतींत नेहमीं संघर्ष निर्माण होण्याचे प्रसंग उद्भवत. सहकारी खात्याचा अधिकारी–वर्ग विविक्षित चाकोरींतूनच कार्य करीत असल्यानें शहरी व ग्रामीण कार्यकर्त्यांचा वाढता संघर्ष कसा दूर करतां येईल याबाबत अधिकारी वर्ग संयुक्त परिषदा घेत असे; तथापि व्हावा तसा उपयोग न दिसून आल्यानें के. दादासाहेब काळे यांनीं सातारा येथें भरलेली सहकारी परिषद (१९३४–३५ साल असावें) या संघर्षांतून यशस्वी रीतीनें पार पाडली! ही परिषद त्यावेळीं हजर असलेल्या कार्यकर्त्यांच्या स्मरणांतून अद्यापिहि गेली नसेल! के. दादासाहेब यांनीं शहरी व ग्रामीण भागांतील परिस्थितीचें यथायोग्य दिग्दर्शन एका ठरावांत करून कार्यकर्त्यांतील एकजूट सहकारी चळवळीस कशी पोषक होईल अशी पार्श्वभूमि विषद करून तो ठराव मांडण्याचें व त्यावर भाषण करण्याचें कार्य मजकडे दिलें. योगायोग म्हणा किंवा के. दादासाहेबांच्या त्या ठरावांतील योग्य त्या मार्गदर्शनानें म्हणा, परिषदेचें तंग वातावरण विसर्जन पावलें! के. दादासाहेब यांनीं त्या मंजूर झालेल्या ठरावावरील भाषणाबद्दल मला शाबासकी दिली! तरुण कार्यकर्त्यांना प्रसंगोपात्त कार्यप्रवण करून त्यांना कौतुकानें प्रोत्साहन देणें या सद्गुणाचेंच दिग्दर्शन यावरून होत नाहीं कां?

### २. अर्थशास्त्रज्ञ समाजांत मिळून–मिसळून वागला पाहिजे!

अर्थशास्त्रज्ञ म्हटला कीं, त्यानें समाजांतील कार्यकर्त्यांपासून अलिप्त राहून, कार्यकर्ते येतील त्या वेळेसच सल्ला द्यावयाचा या अलिखित रूढीशीं के. दादासाहेब सहमत नव्हते. देशांतील उत्पन्न होणाऱ्या वेगवेगळ्या आर्थिक समस्यांची तपशीलवार माहिती अत्यंत सुलभ अशा भाषेंत सर्वसाधारणपणें खालचे थरांतील व्यापारी कारखानदार मंडळीपुढें मांडून, देशांतील आर्थिक धोरण काय आहे, हें वेळोवेळीं प्रसंगानुसार के. दादासाहेब मांडीत असत.

ब्रिटिश अमदानींत रुपयाचा भाव १६ पेन्सवरून १८ पेन्सवर गेल्यावर एकंदर हिंदुस्तानचे व्यापार-उदीमावर, परदेशीं पाठविल्या जाणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीवर काय परिणाम होईल याची वर्तमानपत्रीय चर्चा जरी चालू होती, तरी के. काळे यांनीं पुणें येथें व इतरत्र इंग्रजी-मराठींतून व्याख्यानद्वारां या विषयाची माहिती व चर्चा सुरू केली होती. यांतील त्यांची पुणें सराफ बाजारांत दोन व्याख्यानें मराठींतून व एक व्याख्यान गोखलेहॉलमध्यें इंग्रजींतून करण्याचा योग मला लाभला होता.

सहकारी चळवळींत व इतरत्र ज्या वेळीं गांठीभेटींचा योग के. दादासाहेबांशीं येत असे त्या वेळीं ते नेहमीं म्हणत कीं, तुमच्यासारखी तरुण कार्यकर्ती निदान २५ मंडळी मला मिळाल्यास मी अनेक उपयुक्त कार्ये करूं शकेन अशी मला उमेद आहे! ज्या वेळीं अशी कार्यकर्ती मंडळी त्यांना लाभली त्या वेळीं "मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज, पुणें"ची स्थापना सन १९३४ सालीं केली व त्यानंतर लगेच एक वर्षाचे कालावधींत चेंबर तर्फे "दि बँक ऑफ महाराष्ट्र लि."ची (१९३५ सालीं) स्थापना त्यांच्या नेतृत्वाखालीं झाली.

### ३. खासगी प्रयत्नानें "व्यापारी बँकच" यशस्वी होईल! दूरदर्शित्व

१९३४–१९३५ साल हें 'महाराष्ट्र बँकेच्या' प्राथमिक तयारीचें वर्ष. मराठा चेंबरच्या स्थापनेनंतर चेंबरनें पहिलें महत्त्वाचें कार्य जर हातीं घेतलें असेल तर तें महाराष्ट्रांत बँकेची स्थापना करावयाची हें होय. सहकारी क्षेत्रांत बँकिंगव्यवसायानें लोकांमध्यें विश्वास उत्पन्न झाला होता; त्याचा मोठ्या प्रमाणावर योग्य तो उपयोग करून घेऊन महाराष्ट्रीय उद्योगधंद्याचे वाढीस साहाय्य करण्याचे दृष्टीनें बँक काढण्याचें चेंबरमध्यें ठरलें. त्याप्रमाणें प्राथमिक बैठकी चेंबरच्या कचेरींत, केसरीवाड्यांत होत असत. मी एक कमिटीचा सदस्य म्हणून काम करीत असे. के. गोपाळराव आपटे ऑडिटर यांनीं बँकेचे मेमोरॅन्डम व आर्टिकल्स तयार केलीं, व एका बैठकींत चर्चेसाठीं ठेविलीं. त्या वेळीं बँकेचें नांव काय ठेवावयाचें याबद्दल बरीच चर्चा होऊन बँकेचे नांवांत 'औद्योगिक' या शब्दाचा समावेश बँकेचें धोरण दाखविणेचे दृष्टीनें असावा असें कांहीं सभासदांनीं सुचविलें. याला एक महत्त्वाचें कारण असें घडलें होतें कीं, त्यावेळचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज मि. अडवानी हे प्रसंगोपात्त आपल्या भाषणांतून उत्पादक धंदे वाढविण्याचे दृष्टीनें "मुंबई राज्यांत" औद्योगिक बँका निघाल्या पाहिजेत असें प्रतिपादित असत. या दृष्टीनें आपल्या बँकेची स्थापना 'औद्योगिक' धोरणास अनुसरून असावी असा आग्रह कांहीं सदस्यांनीं धरला होता. के. दादासाहेब काळे या सूचनेशीं सहमत नव्हते! त्यांनीं 'टाटा इंडस्ट्रिअल बँकेची" सर्व हकीकत सांगून टाटा इंडस्ट्रिअलमध्यें असलेल्या उद्योगपतींना सुद्धां ती बँक "सेंट्रल बँक ऑफ इंडिआ" मध्यें विलीन कां करावी लागली याचें मार्मिक विवेचन करून आम्हां मंडळींना "औद्योगिक" या धोरणाचा आग्रह न धरण्याविषयीं परोपरीनें सांगितलें; परंतु आम्हां मंडळींची समजूत पटेना! के. दादासाहेबांनीं "सध्यां आपण एक 'व्यापारी बँक' यशस्वी करूं व नंतर कारखानदारीचें भांडवलासाठीं परदेशांतून 'इन्व्हेस्टमेंट' ट्रस्ट मार्फत भांडवल–पुरवठा केला जातो त्या धर्तीवर आपणही 'इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट' काढूं" असा दिलासा दिल्यावर "दि बँक ऑफ महाराष्ट्र लि" नांव सर्वसंमत झालें बँकेचे प्रमोटिंग डायरेक्टरांमध्यें माझें नांव यादींत होतें. बँकेचें संचालक मंडळ वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रतिनिधींचें असावें. विशेषतः त्यांत कारखानदारीशीं संबंधित एकदोन प्रतिनिधी असावेत ही सूचना मान्य होऊन पुण्याच्या जवळच असलेल्या कागद गिरणीचे संचालक व वितरक यांचीं नांवें सुचवून मी माझें नांव मागें घेतलें!

### ४. महाराष्ट्र बँक : प्रो. काळे ह्यांची महाराष्ट्राला देणगी

ब्रिटिश अमदानींतील बँकिंग व्यवसायाला प्रतिकूल परि-

स्थितींत निघालेली संयुक्त भांडवलाची ही पहिली व्यापारी बँक! त्यानंतर प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल, भारत इंडस्ट्रिअल, महाराष्ट्र इंडस्ट्रिअल, इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट, डेक्कन इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट अशा संस्था निघाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतांतील औद्योगिक धोरणांत आमूलाग्र बदल झाला असून औद्योगिक भांडवलपुरवठा मध्यवर्ती सरकारनें व प्रांतिक सरकारनें आपले हातीं घेतला हे राष्ट्रहिताचें दृष्टीनें योग्यच झालें. देशांतील आर्थिक धोरणानुसार बँकिंग व्यवसायास मजबुती प्राप्त होण्याचे दृष्टीनें व ठेवीदारांचे सुरक्षिततेच्या दृष्टीनें जें धोरण आंखलें त्यांत कांहीं व्यापारी व औद्योगिक बँका विलीनीकरणांत सांपडल्या, कांहीं बंद झाल्या, तर कांहीं सरकारनें बंद केल्या! याच्या अनेक कारणांपैकी एक कारण म्हणजे या संस्थांची मजबुती व वाढ अपेक्षेप्रमाणें होऊं शकली नाहीं!

महाराष्ट्र बँक १९३५ सालापासून चंद्रकलेप्रमाणें मजबूत पायावर वाढत जाऊन आज तिला रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणें 'अ' वर्ग प्राप्त झाला आहे. बँकेचें धोरण देशांतील व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत भांडवलपुरवठ्याचें असून महाराष्ट्र राज्यांत तिनें मानाचें स्थान मिळविलें आहे. संचालक मंडळांतहि नामवंत कारखानदार मंडळी कार्यकर्ती म्हणून मिळाली असून ती ध्येयवादी मंडळी बँकेचें नांव उज्ज्वल करतील अशी त्यांची परंपरा आहे. के. दादासाहेब यांचे आत्म्यास हें वैभव पाहून चिरंतन शांति लाभेल यांत शंका नाहीं.

मी दादासाहेबांचे चरणीं ही आदरांजली समर्पण करून त्यांना अभिवादन करीत आहे.

---

# मि. विन्स्टन चर्चिल

गेल्याच महिन्यांत मि. चर्चिल ह्यांनीं आपला ९० वा वाढदिवस साजरा केला, त्या वेळींच जगांतील सर्व विचारवंतांनीं त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. युद्धकालांतील संकटसमयीं त्यांनीं ब्रिटिश जनतेच्या निःस्वार्थीपणास आवाहन करून धैर्यानें आणि प्रभावीपणें, सचोटीच्या नेतृत्वानें जें स्वातंत्र्य टिकविलें त्याची आठवण झाली म्हणजे अशा नेतृत्वाची आपल्याला आजहि गरज आहे हें लक्षांत घेऊन अशा नेत्याची उणीव भासते. घाम आणि अश्रु ह्यांची मागणी करणारा कणखर राजकीय पुढारी आज आहे कुठें?

१९४० सालीं ग्रेट ब्रिटनला जसें नेतृत्व लाभलें, तसें आज आपल्या देशाला हवें आहे. मि. चर्चिल ह्यांचा कित्ता आपले राजकीय पुढारी स्वतःसमोर ठेवतील काय?

**ह्यावेळीं बढती मागूं नका!**

(१) साहेबाच्या पुढेंपुढें करणाराला बढती मिळाली; सच्या कामाच्या माणसाला मिळालीच नाहीं.

(२) फर्मचा धंदा नीट चाललेला नाहीं.

(३) साहेब कामाच्या ताणानें वाकला आहे किंवा त्याचें मन अस्वस्थ आहे.

(४) साहेबानें तुमची नुकतीच प्रशंसा केली आहे.

## बढती मिळविण्याची कला

### काय करा आणि काय करूं नका

पगारवाढीला तुम्ही पात्र आहात, ह्याची खात्री कशानें होईल? आणि तशी खात्री असली, तर पगारवाढ कशी मागायची?

अमेरिकेंतील सात तज्ज्ञांनीं त्यांना विचारलेल्या प्रश्नांचीं दिलेलीं उत्तरें मार्गदर्शक होतील :—

(१) तुमच्याकडून अपेक्षित असेल त्यापेक्षा चांगलें काम करा. जास्त द्या म्हणजे जास्त मिळेल.

(२) तुमच्या साहेबाला ज्या पद्धतीनें काम हवें असेल, त्या पद्धतीनें करा. तुम्ही कितीहि चांगल्या प्रकारें तें केलें पण साहेबाला तें आवडलें नाहीं, तर कांहीं उपयोग नाहीं.

(३) तुमच्या सहकाऱ्यांशीं आणि तुमचा संबंध येणारांशीं मिळूनमिसळून वागा.

(४) तुम्हीं काय करता, तें तुमच्या साहेबाच्या नजरेस येऊं द्या. साहेबाला तें दृष्टीसच पडलें नाहीं तर त्याचें तो चीज तरी कसें करणार?

(५) निर्णय करण्यास शिका. फारच थोड्यांना हें साधतें; बहुतेक लोकांमें असतात आणि निर्णय घेण्याचें टाळतात.

(६) सोपविलेल्या कामापेक्षाहि इतर जबाबदाऱ्या पत्करण्याची तयारी ठेवा. हिशेबखात्यांतील दुय्यम कारकुनानें कारखान्यांतील एखाद्या कामाबद्दल आत्मविश्वास दाखविला, तर पांचसात वर्षांत तो फलद्रूप झाल्याविना रहाणार नाहीं.

(७) रात्रीं जागून अभ्यास करा आणि माहिती अद्ययावत् राखा. आपल्या शेजारांतील ग्रंथालय, इस्पितळ, इत्यादींना उपयोगी पडण्याची संधि दवडूं नका. त्यामुळें ओळखी होतील आणि तुम्हाला कुणीतरी विचारील, "आमच्या फर्ममध्यें का नाहीं येत? आम्हीं जास्त पगार देऊं."

तुमची ज्या जागीं बढती होण्याची अपेक्षा आहे, त्या जागीं काम करणारांच्या वयाची माहिती मिळवा.

काम वाढलें किंवा त्याचा दर्जा वाढला तरी पगार वाढ आपोआप क्वचितच मिळते. वाट पहात बसाल तर बढती मिळणें कठीणच. बढतीचें वेळापत्रक ठरलेलें असलें तरी त्यापेक्षा पात्रता वाढलेल्यांची कुचंबणाच होणार.

ह्या बाबतींत साहेबाची भेट होण्यापूर्वी नीट विचार करा. स्वतःमधील उणीवा लक्षांत आणा. त्याबाबत साहेबाला विचारा. त्याची टीका ऐकून घ्या; कदाचित् प्रत्यक्ष बढतीपेक्षा ती टीकाच हितकारक ठरायची.

तुम्हीं स्वतः फर्मसाठी करीत असलेल्या कामाला किफायतशीर किंमत मिळविण्याचा प्रयत्न तुम्हांला करावयाचा असतो. तेव्हां, आपण बढतीला कसें पात्र आहांत, हें साहेबाला पटवून द्या.

इतर ठिकाणीं अधिक पगार मिळणार आहे, असें सांगून बहुतेक जण बढती मिळवितात. कांहीं तज्ज्ञांच्या मतें ही बढती साहेब देईल, पण सहा महिन्यांनीं तुमच्या जागीं दुसऱ्याला नेमून तुम्हांला काढून टाकील; त्यासाठीं वेळ मिळावा म्हणून तुमचें म्हणणें मान्य करील. जास्त पगाराची गरज आहे, हा मुद्दा साहेबाला पटणार नाहीं. अपत्यांच्या संख्येंत भर पडल्यामुळें तुम्हीं काम कांहीं जास्त करीत नाहीं, मग पगार का जास्त यावा?

बढती मागायचे ठरवलें, आणि मागते वेळीं साहेबानें साफ नकार दिला तर? त्याच जागीं काम करीत राहणें कठीणच व्हावयाचें. फर्मची प्रगति आणि आपल्या कामाची प्रगति ह्या दोन्हींचाहि नीट अभ्यास केलेला असला, तर अशी अवस्था टळूं शकेल.

थोडासा धोका पत्करल्याखेरीज यश येणें कठीणच. नोकरीच्या क्षेत्रांतहि "साहसे श्रीः प्रतिवसति" हेंच खरें.

## लहान उद्योगधंदे

### श्री. रत्नाप्पा कुंभार ह्यांचे महत्त्वाचे विचार

"अर्था"च्या ता. १६ डिसेंबर १९६४ च्या अंकांत महाराष्ट्रांतील कार्यकर्ते श्री. रत्नाप्पा कुंभार यांनीं जपानमधील लहान उद्योगधंद्यांच्या केलेल्या पाहणीसंबंधीं मजकूर आलेला आहे. ही माहिती फारच महत्त्वाची, विचारप्रवर्तक व उद्बोधक होईल.

श्री. रत्नाप्पा कुंभार यांनीं या बाबतींत कांहीं आंकडेवारीहि माहिती दिलेली आहे. ते म्हणतात, "जपानमधील एकूण सर्व कारखान्यांच्या संख्येमध्यें लहान धंद्यांचें प्रमाण ९९ टक्के पडतें. मोठ्या उद्योगधंद्यांचें प्रमाण फक्त १ टक्का."

वरील दृष्टीनें विचार करतां भारतांतहि लहान धंद्यांच्या वाढीस पुष्कळच वाव असावा असें दिसून येईल. हे लहान धंदे ग्रामीण भागांत निघाल्यास तेथील जनतेस पुष्कळच फायदा होईल.

श्री. रत्नाप्पा म्हणतात, "लोकसंख्येनें बेजार झालेल्या आमच्यासारख्या भारत देशामध्यें लहान धंद्यांचा प्रसार आणि व्यवस्था जपानमधील धंद्यांप्रमाणें होण्याची गरज आहे; आणि त्या दृष्टीनें जपानमधील चालू असलेल्या उद्योगधंद्यांची पाहणी सरकारी पातळीवरून व्हावी, आणि त्याची अंमलबजावणी आमच्या देशामध्यें केली जावी असें मला प्रामाणिकपणें वाटतें."

आपल्या निवेदनाच्या शेवटीं श्री. रत्नाप्पा कुंभार म्हणतात कीं, "आम्ही जें थोडेंबहुत पाहिलें आहे त्या बाबतींत आमच्या लहान क्षेत्रांत जें कांहीं करतां येण्यासारखें आहे तें करण्याचा माझा विचार आहे."

श्री. रत्नाप्पा कुंभार यांनीं ध्वनित केलेले वरील उद्गार फारच मौलिक आहेत यांत संदेह नाहीं. कारण ते मोठे कार्यकर्ते आहेत व ग्रामीण भागाशीं त्यांचा निकट व घनिष्ठ संबंध आहे हें सर्वश्रुत आहेच.

—वा. कृ. कोमेकर

## स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनचा करार

भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें स्वीडनमधील एका व्यापारी कंपनीशीं आयात-निर्यातीसंबंधीं करार केला आहे. स्वीडिश कंपनी युरोपमधील देशांचा माल भारताला पाठवील. कराराला अनुसरून भारत व स्वीडन ह्यांच्या दरम्यान १९६५ सालीं २०५ लाख रुपये किमतीच्या मालाची आयात-निर्यात करण्यांत येईल. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन स्वीडिश कंपनीला सतरंज्या, काथ्याचा माल, अभ्रक, कॉफी, तंबाखू, अर्धवट कमावलेलीं कातडीं इत्यादि माल पुरविणार आहे. ह्या मालाची किंमत सुमारें १०५ लाख रुपये होईल. उलटपक्षीं कॉर्पोरेशन १०० लाख रुपयांचा माल आयात करील. त्यांत कांहीं प्रकारच्या यंत्रसामग्रीला लागणारे सुटे भाग आणि पारा हा माल असेल. पश्चिम युरोपामधील माल आयात करणें ह्या करारामुळें सुलभ होणार आहे.

## ऑडिटरसंबंधीं कांहीं सत्य, कांहीं विनोद

### शब्दांचें अवडंबर

ऑडिटरच्या रिपोर्टांतील शब्दजंजाळांतून एवढाच मुद्याचा भाग उरतो :—"क्ष बँकेचा ताळेबंद आम्हीं तपासला आहे. आम्हांला पुरविलेली माहिती सत्य असेल, आम्हांला दिलेले खुलासे खरे असतील, बँकेच्या हिशोबाच्या वह्यांत बनवेगिरी नसेल, ह्यांच्याकडून आलेलीं पत्रकें खोटीं नसतील, तर ताळेबंद ठीक आहे."

### इंजिनिअरचें मत असंदिग्ध

एकदा एका इंजिनिअरला एक इमारत तपासून सल्ला देण्यासाठी बोलावलें. त्यानें सर्वच इमारत काळजीपूर्वक तपासली, आणि "इमारतीला मुळींच धोका नाहीं." असा आपला अभिप्राय लेखी सादर केला. त्याच्या शब्दांत कुठेंहि संदिग्धता नव्हती. बँकेच्या ऑडिटरचें त्यानें अनुकरण केलें असतें, तर त्यानें खालीलप्रमाणें सर्टिफिकेट दिलें असतें :—"मी अमुक इमारत तपासली. पाया खचला नाहीं, छप्पर कोसळलें नाहीं, भिंती पडल्या नाहींत, तर इमारत पूर्णपणें सुरक्षित आहे."

### ऑडिटर : मालकिणीच्या मांडीवरचें कुत्रें

ऑडिटर हा राखण करणारा कुत्रा नव्हे, शिकार करणाराहि कुत्रा नव्हे; तो भांडवलदार मालकिणीच्या मांडीवरला लॅपडॉग आहे. तो भुंकत नाहीं, कीं चावत नाहीं; फी मिळाली म्हणजे तो चाटतो आणि शेपटी हालवतो.

### चार्टर्ड अकौंटंट, डॉक्टर आणि वकील

चार्टर्ड अकौंटंट, डॉक्टर आणि वकील असे तिघे स्वर्गलोकाच्या दारीं जाऊन प्रवेश मागूं लागले. त्यांची तपासणी करण्यांत आली तेव्हां इन्कम टॅक्सच्या फॉर्मवर आपण खोटेपणा केला असल्याचें अकौंटंटनें कबूल केलें. स्वर्गाभोंवतीं पंचवीस फेऱ्या मारण्याची त्याला शिक्षा देण्यांत आली. नंतर डॉक्टरची तपासणी झाली. आपण मृत्यूच्या दाखल्यांत खोटेपणा केल्याचें त्यानें कबूल केलें. त्याला शंभर फेऱ्या मारण्याची सजा मिळाली. नंतर वकिलाची पाळी आली, पण तो तेथून बेपत्ता झाला होता. स्वतःच्या प्रचंड खोटेपणाची त्याला पूर्ण कल्पना असल्याकारणानें, तो आपली मोटारसायकल आणण्यासाठीं गेला होता !

### "बाकी ताळेबंद बरोबर आहे"

चार्टर्ड अकौंटंटचें सर्वांत मौलिक काम, म्हणजे ताळेबंदावरील सही. बैल गेला आणि झोपा केला, अशी त्याची अवस्था असते, त्याच्या कित्येक रिपोर्टांचा आशय असा असतो:—"आम्हीं ताळेबंद तपासला आहे. कॅश फुगवून दाखविले आहे; कारण कॅशिअरला पैशांची गरज होती. येणीं मुदतीबाहेर गेलीं असल्यानें तीं वसूल होण्याजोगी नाहींत; फारच थोडीं येणीं वसूल होण्याची शक्यता आहे. शिलकी माल सर्व टाकाऊ असून मोजदादहि फार जुनी आहे. त्याची लावलेली किंमत अवास्तव आहे. आमच्या हिशेबाप्रमाणें, फर्ममध्यें कांहींहि तथ्य उरलेलें नाहीं. बाकी ताळेबंद बरोबर आहे."

दांतांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## " फॉरिन कोलॅबोरेशन "

### हिंदी उपक्रमांतील परदेशीयांची भागीदारी

परदेशी फर्म्सच्या भागीदारींत काढलेल्या कारखान्यांच्या वसूल भांडवलापैकी सरासरीनें १९.९% भांडवल परदेशी असल्याचें आढळून आलें आहे.

**१३१ हिंदी कंपन्या : १७३ करार**

( लक्ष रुपये )

| देश (१) | कोलॅबोरेशनचे करार (२) | कंपन्यांचें वसूल भांडवल (३) | त्यापैकी विदेशी भांडवल (४) | (४) चें (३) शी % |
|---|---|---|---|---|
| अमेरिका | ४२ | ५५६७ | ११३० | २०.३ |
| ग्रेटब्रिटन | ४८ | ३५६४ | ६०२ | १६.९ |
| प. जर्मनी | २२ | १५९३ | ५७ | ३.६ |
| फ्रान्स | ४ | ५६० | ७४ | १३.१ |
| जपान | २० | ७७४ | ७७ | १०.० |
| इटली | ५ | ६७७ | १२४ | १८.३ |
| स्वीडन | ५ | ५५० | ३०१ | ५४.८ |
| स्वित्झरलंड | ५ | ५६९ | ५५ | ९.७ |
| कॅनडा | ३ | ४८० | ८९ | १८.५ |
| इतर | १९ | ९६१ | १८ | १.९ |
| एकूण | १७३ | १२७१८ | २५२७ | १९.९ |


---

## अमेरिकेंत धूम्रपान सोडून देण्याची प्रवृत्ति

अमेरिकेचे सर्जन डॉ. टेरी ह्यांनीं गेल्या वर्षाच्या प्रारंभीं धूम्रपान व कॅन्सर ह्यांच्यांतील संबंधाविषयींचा अहवाल सरकारी व खाजगी डॉक्टरांच्या मंडळाला सादर केला होता. ह्या वर्षीं धूम्रपान आणि आरोग्य ह्यासंबंधीं आणखी एक अहवाल त्यांनीं मंडळाला पाठविला आहे. अहवालांत देण्यांत आलेल्या माहितीप्रमाणें असें दिसतें कीं, १९६२ सालापासून अमेरिकेंतील १.८ कोटी नागरिकांनीं सिगारेट्स ओढण्याचें सोडून दिलें आहे. धूम्रपान सोडणाऱ्या स्त्रियांच्या संख्येंत मात्र फार मोठी घट झालेली नाहीं. धूम्रपान करणाऱ्या लोकांच्या मताची पाहणी करण्यांत आली असतां ६९ टक्के लोकांच्या मतानें कॅन्सर रोगाची लागण होण्यांत धूम्रपान हें एक महत्त्वाचें कारण आहे. सिगारेटच्या व्यसनामुळें उत्पन्न होणारे आरोग्यविषयक धोके इतके गंभीर आहेत कीं, त्या व्यसनाला आळा घालण्यासाठीं सरकारी प्रयत्न झाले पाहिजेत असा विचार प्रत्येक १० लोकांपैकीं ७ जणांनीं बोलून दाखविला. धूम्रपान आणि आरोग्य ह्यांच्यांतील संबंधाविषयीं लोकांना सार्वजनिक शिक्षण देण्यांत आलें पाहिजे असें मत मुलाखत घेतलेल्या लोकांपैकी ९० टक्के लोकांनीं व्यक्त केलें. ८० टक्के लोकांनीं अशी सूचना केली कीं, सिगारेटच्या प्रत्येक पाकिटावर त्यांत असलेल्या हानिकारक द्रव्यांची स्पष्ट कल्पना देणारी माहिती छापलेली असावी. डॉ. टेरी ह्यांच्या मतानें सिगारेटस ओढण्याची संवय फार खोल रुजलेली असते. परंतु, धूम्रपानाच्या हानिकारक परिणामांची खरी माहिती लोकांना देण्यांत आली तर ही संवय सोडण्यास लावणें अशक्य नाहीं. अमेरिकेंतील तज्ज्ञांच्या मतानें सिगारेटस ओढण्याची संवय ही अमेरिकेवरील राष्ट्रीय आपत्ति आहे. ह्या घातुक संवयीमुळें दरसाल सुमारें १ लाख २५ हजार ते ३ लाख अमेरिकन लोक निधन पावतात.


माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.


महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
" विजय " नांगर
वापरा. ४, ६ व ८ बेली
फाळ व सुटे भाग
तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्






१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

STUDIO SARJERAO




मुदतीच्या ठेवींवर आपण आता
युनायटेड वेस्टर्न बँकेंत
पावणे सात टक्के
पर्यंत व्याज मिळवूं शकता.

युनायटेड वेस्टर्न
बँकेंत आपली ठेव ठेवणें
केव्हांहि आपल्या हिताचें
आणि फायद्याचेंहि आहे.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा
( स्थापना ) १९३६
बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

अंबरनाथ व नातेपुतें
येथें बँकेच्या नवीन शाखा लौकरच सुरू होत आहेत.

**दडवून ठेवलेला पैसा**—कलकत्ता शहरांत प्राप्तिकर खात्यातर्फे गेल्या कांहीं दिवसांत १४ ठिकाणीं झडत्या घेण्यांत आल्या. ह्या झडत्यांत अधिकाऱ्यांना १४ कोटी रुपयांच्या दडवलेल्या विनहिशेबी नोटा आढळून आल्या. चार–पांच वर्षांत न भरलेला कर अगर तो न भरण्याबद्दल होणारा दंड ह्यांच्या पोटीं हा सर्व पैसा सरकारच्या उत्पन्नांत जमा करण्यांत आला. एका कंपनीच्या मालगुदामांत तर ९० लाख रुपयांच्या नोटांनीं भरलेलें पोतेंच सांपडलें.

**जमाकडे असलेलें अमेरिकेचें येणें**—अमेरिकेच्या व्यापारखात्यानें १९६४ च्या जून अखेरचा आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यांतील माहितीप्रमाणें परदेशांचीं सरकारें आणि परदेशी कंपन्या ह्यांच्याकडून अमेरिकेला १,६६० कोटी डॉलर्स येणें आहेत. ही रक्कम त्यामागील वर्षापेक्षा १०० कोटी डॉलर्सनीं अधिक आहे. सुमारें ४०० कोटी डॉलर्स ब्रिटनकडून येणें आहेत. येणें असलेल्या कर्जांपैकी दोनतृतियांश कर्जे अविकसित राष्ट्रांना दिलेलीं आहेत. कर्जांपैकीं कित्येक अशीं आहेत कीं त्यांची फेड येत्या ४० वर्षांत होणार नाहीं.

**सावधगिरीचा इशारा**—संततिनियमनाच्या प्रचारांत पुरुष व स्त्रिया ह्यांच्यावर करण्यांत येणाऱ्या निर्बीजीकरणाच्या शस्त्रक्रियेवर जोर देण्यांत येतो. पैकीं स्त्रियांवर करण्यांत येणाऱ्या शस्त्रक्रियेमुळें होणाऱ्या परिणामाविषयीं पुरावा आढळून आला आहे. ह्यासंबंधीं करण्यांत आलेल्या ऑस्ट्रेलिआंतील एका अहवालांत अशी माहिती देण्यांत आली आहे कीं, शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांपैकीं १० टक्के स्त्रिया मानसिक आजाराला बळी पडतात. कांहींवर औदासीन्याची दाट छाया पसरते. नवरा आपल्याशीं एकनिष्ठ नसल्याच्या कल्पनेमुळें त्या दुःखीकष्टी होतात.

**मुद्राराक्षसाचें रशिअन भाषांतर**—रशिआंतील एका संस्कृत भाषा-कोविदानें विशाखादत्तकृत 'मुद्राराक्षस' ह्या प्राचीन संस्कृत नाट्यकृतीचें रशिअन भाषेंत भाषांतर केलें आहे. भाषांतर मूळ संस्कृत नाटकावरून करण्यांत आलें असून तें रशिअन भाषेंतील पहिलेंच आहे. मूळ नाटकाची भाषा व शैली भाषांतरांत चांगली साधली आहे.

**नफ्याच्या प्रेरणेचा उपयोग**—एखाद्या कारखान्याची कार्यक्षमता अजमावण्यासाठी त्याला होणारा नफा ही कसोटी ठरवून देण्याची पद्धत रशिआंत वाढीस लागली आहे. ह्या प्रेरणेच्या अभावीं कारखान्यांच्या चालकांत जबाबदारीची जाणीव उत्पन्न होत नाहीं आणि मालाच्या दर्जावरहि परिणाम होतो असें आढळून आलें आहे. आतां नफ्याच्या प्रेरणेचा उपयोग अवजड उद्योगधंद्यांतूनहि केला जाणार आहे.

**विजेच्या भारी यंत्रसामग्रीचा कारखाना**—हरद्वारजवळ रशिआच्या मदतीनें काढण्यांत येत असलेला विजेच्या भारी यंत्रसामग्रीचा कारखाना १९६७ च्या मध्याच्या सुमारास उत्पादन करूं लागेल. उत्पादनास प्रारंभ झाल्यावर दरसाल ४५ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होईल. कारखान्याच्या उभारणीसाठी एकूण ६८ कोटी रुपये खर्च येणार आहे. त्याच्या साह्यानें विजेच्या भारी यंत्रसामग्रीबाबत भारत स्वयंपूर्ण होईल.

**मध्यप्रदेशांतील कोळसा-खाणी**—मध्यप्रदेशांतील ईशान्य भागांत दगडी कोळशाचा विपुल साठा आढळून आला आहे. कोळसा असलेल्या भागाचें एकूण क्षेत्रफळ सुमारें ८०० चौरस मैल असून त्यांपैकीं कांहीं प्रदेश उत्तरप्रदेशांतील मिर्झापूर जिल्ह्यांत पसरलेला आहे. २२ चौरस मैलांच्या प्रदेशाची तपशीलवार पाहणी झाली असून तेथें २३० कोटी टन कोळसा असावा असा अंदाज आहे.

**इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें १६ वर्षांत ( ३० जून, १९६४ अखेर ) मंजूर केलेलीं कर्जे**
**( आंकडे लक्ष रुपयांचे )**

| राज्य / प्रदेश | उद्योगांची संख्या | रक्कम | | | | एकुणाशीं प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जें | गॅरंट्या | अंडररायटिंग | एकूण | |
| आंध्रप्रदेश | २५ | ९४९.९६ | ४३३.४२ | १२७.८९ | १५११.२७ | ७.७ |
| आसाम | ७ | २९२.८७ | — | *३५०.०० | ६४२.८७ | ३.३ |
| बिहार | १९ | ९१९.२० | २३६.०० | ३१.०० | ११८६.२० | ६.० |
| गुजराथ | २५ | १११४.८९ | ५७.२६ | ८८.२५ | १२६०.४० | ६.५ |
| केरळ | १० | ७९१.०० | १०२.४३ | १५.०० | ९०८.४३ | ४.६ |
| मध्यप्रदेश | ५ | २३४.२७ | २६.०५ | २२.०० | २८२.३२ | १.४ |
| मद्रास | ३६ | १८५७.२५ | ७५५.०० | २७०.०० | २८८२.२५ | १४.७ |
| महाराष्ट्र | ६८ | २९७१.८० | १५०.३७ | २७८.०० | ३४००.१७ | १७.३ |
| म्हैसूर | २५ | ११२५.६४ | २१४.२६ | २३.०० | १३६२.९० | ६.७ |
| ओरिसा | १० | ५३०.१५ | १४९.१३ | ७०.०० | ७४९.२८ | ३.८ |
| पंजाब | २२ | ९२७.९३ | ५४.७३ | २६.५० | १००९.१६ | ५.१ |
| राजस्थान | ७ | ४५९.३७ | ४५०.०० | १३.०० | ९२२.३७ | ४.७ |
| उत्तरप्रदेश | २८ | ११७२.६६ | १६१.९७ | ४५.५० | १३८०.१३ | ७.० |
| प. बंगाल | ४२ | १६४२.१६ | २८८.८४ | ४७.५० | १९७८.५० | १०.१ |
| दिल्ली | ३ | ८२.६२ | ६२.४० | ५.०० | १५०.०२ | ०.८ |
| अंदमान–निकोबार | १ | ११.०० | — | — | ११.०० | ०.१ |
| पाँडिचरी | १ | ३५.०० | ५.६२ | — | ४०.६२ | ०.२ |
| एकूण | ३३४ | १५११७.७७ | ३१४७.४८ | १४१२.६४ | १९६७७.८९ | १००.० |

**भारताचा मोफत प्रवास**—न्यूयॉर्क येथें भरलेल्या जागतिक प्रदर्शनाला भेट देणाऱ्या १० निवडक अमेरिकन लोकांना भारताच्या प्रवासी खात्यानें मोफत भारत प्रवास घडविला आहे. त्यांची निवड चिठ्ठ्या टाकून करण्यांत आली. त्याशिवाय भारताबद्दल व भारताच्या प्रदर्शनांतील दालनाबद्दल त्यांची लेखी चांचणीहि घेण्यांत आली. भारतामधील त्यांचा प्रवासखर्च एअर-इंडिआ करणार आहे.

**नवीन करपात्र लोक**—प्राप्तिकर खात्याच्या अधिकाऱ्यांनीं इंदूर विभागांत ८,००० नवे करपात्र लोक शोधून काढले आहेत. गेल्या जुलै महिन्यापासून डिसेंबरअखेरपर्यंत खात्यानें घरोघरीं आणि कचेऱ्याकचेऱ्यांतून शोध करून ह्या लोकांचा तपास लावला. त्यांपैकीं २ हजार आसामी तरी बड्या धेंडांत मोडण्याइतके गबर आहेत.

**कापडांच्या तऱ्हांचा अडथळा**—भारतांत कापसाच्या कापडाच्या इतक्या अनेक तऱ्हा तयार होतात कीं, त्यामुळेंच कापडाच्या धंद्याचा वास्तववादी पद्धतीनें विकास करणें अवघड होतें. कांहीं निवडक व ठराविक कापडांचें विपुल उत्पादन करण्याची पद्धत नसल्यामुळें कापडाच्या उत्पादनाचा खर्च वाढतो. आणि परिणामीं आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत हिंदी कापड स्पर्धा करूं शकत नाहीं, अशी माहिती व्यापारखात्याचे उपमंत्री श्री. रामस्वामी ह्यांनीं सांगितली.

**इंडोनेशियाला करण्यांत आलेली मदत**—संयुक्त राष्ट्र संघटनेंतून बाहेर पडण्याचा निर्णय इंडोनेशियानें घेतला आहे. इंडोनेशिआ १४ वर्षांपूर्वी संघटनेंत दाखल झाला. तेव्हांपासून संयुक्तराष्ट्र संघटनेनें त्याला ३·५ कोटी डॉलर्सची मदत केलेली आहे, आणि संघटनेंतून बाहेर पडल्याची रीतसर नोटीस देण्यांत येईपर्यंत संघटनेच्या मार्फत आणखी ५ कोटी डॉलर्सची मदत देण्याचें चालूच राहील.

**चीनच्या धोक्याबद्दल इशारा**—सुप्रसिद्ध इतिहासज्ञ अर्नोल्ड टॉयनबी ह्यांनीं, चीननें केलेल्या अणुबॉम्बच्या स्फोटाबाबत इशारा दिला आहे. अमेरिकेंतील दूरचित्रवाणीवर दिलेल्या मुलाखतींत ते म्हणाले, कीं चीनजवळ अणुबॉम्ब असल्यामुळें जगाला फार मोठा धोका उत्पन्न झाला आहे. चीन कम्युनिस्ट आणि आक्रमणशील आहे म्हणूनच केवळ हा धोका उत्पन्न झाला आहे असें नाहीं. अमेरिका आणि रशिआ ह्यांनीं एकत्र येऊन चीनला अणुशस्त्रांची निर्मिति सोडण्यास प्रवृत्त करावें. चीनबाबत कांहींहि धोरण स्वीकारण्यांत आलें तरी तो देश जागतिक शक्ति म्हणून महत्त्व पावणार ह्यांत शंका नाहीं.

**अन्नधान्य मंडळाची वाटचाल**—अन्नधान्य मंडळानें आंध्र राज्यांत ८ लाख आणि मद्रास राज्यांत ३ लाख टन तांदूळ जमा करण्याचें ठरविलें आहे. तांदूळ जमा करण्याचें काम राज्यांच्या नोकरवर्गामार्फत करून घेण्यांत येईल. कॉर्पोरेशन जमा केलेल्या तांदळाची सांठवण करणें, त्याची किंमत चुकती करणें, वाहतुकीची व्यवस्था करणें आणि गरजू राज्यांना तो पुरविणें, हीं कामें करील. मद्रास राज्यांत २ लाख टन सांठवणीचीं आणि आंध्र राज्यांत ३ लाख टन सांठवणीचीं गुदामें बांधण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठी ५ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**मद्रास राज्यांतील अल्युमिनमचा कारखाना**—मद्रास राज्यांत मेटुर धरणाजवळ उभारण्यांत येत असलेल्या अल्युमिनमच्या कारखान्याचें उद्‌घाटन पुढील महिन्याच्या अखेरीस राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् करणार आहेत. हा कारखाना देशांतील ४ था मोठा अल्युमिनमचा कारखाना असून त्याची उभारणी इटालिअन कंपनीच्या साहाय्यानें करण्यांत आली आहे. त्याची वार्षिक उत्पादनक्षमता १० हजार टनांची आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १४·५ कोटी रुपये भांडवल लागलें आहे.


## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर






## बेडेकर

मसाले, लोणचीं व पापड आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.


वापरून पाहा.

मुगभाट, मुंबई ४.

शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU

MADHAVNAGAR (S.R.) INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

### युनायटेड नेशन्सच्या सभासदांची प्रादेशिक वर्गवारी

युनायटेड नेशन्सच्या स्थापनेच्या वेळीं त्याचे ५१ सभासद होते; आतां त्यांची संख्या ११५ झाली आहे. आशिया आणि आफ्रिका खंडांतीलच बहुसंख्य नवे सभासद आहेत. खालील तक्त्यावरून, युनायटेड नेशन्सचा रंग कसा बदलला आहे, हें सहज लक्षांत येईल—

| | १९४५ | १९६४ |
|---|---|---|
| आफ्रिका | ४ | ३५ |
| उत्तर अमेरिका | २ | १ |
| दक्षिण अमेरिका | २० | २० |
| आशिया | ८ | २६ |
| ऑस्ट्रेलेशिया | २ | २ |
| पश्चिम युरोप | ९ | १८ |
| पूर्व युरोप | ६ | १० |
| वेस्ट इंडीज | — | २ |
| एकूण | ५१ | ११५ |

### खनिज तेलाच्या किंमतींत कपात

भारतांत तेलशुद्धीचे कारखाने असणाऱ्या परदेशीय कंपन्यांनीं तेलाच्या आयातीच्या किंमतींत दर पिंपामागें २ सेंटसची कपात केली आहे. ह्या कंपन्यांना अशुद्ध तेल आयात करावें लागतें. दर टनामागें सुमारें ७० पैसे इतकी किंमत कमी करण्यांत आली आहे. तेलशुद्धीचे हे खाजगी मालकीचे कारखाने चालविण्यासाठी दरसाल सुमारें ७·५ लाख टन अशुद्ध तेल लागतें. तेलाच्या आयातीच्या किंमतींत करण्यांत आलेल्या कपातीमुळें भारताच्या परदेशीय चलनाच्या खर्चात दरसाल सुमारें ५३ लाख रुपयांची बचत होणार आहे. अशुद्ध तेलाच्या किंमतींचा दर सहा महिन्यांनीं फेरविचार करण्याचा प्रघात आहे. त्यास अनुसरून किंमतीची फेर आकारणी करण्यांत आली आहे. इतर कंपन्यांशीं स्पर्धा करण्याचा प्रश्नच नाहीं, असा खुलासा करण्यांत आला आहे.

### न जळून जाणाऱ्या विजेच्या बल्बचा शोध

जर्मनीमधील एका वीजकंपनींतील शास्त्रज्ञांनीं जळून निकामी न होणाऱ्या विजेच्या बल्बचा शोध लावला आहे. विजेच्या बल्बमधील तंतु विजेमुळें ३ हजार सेंटिग्रेडपर्यंत तापतात. टंगस्टन अगर इतर ज्या वस्तूंचे हे तंतु तयार केलेले असतात, ते उच्च तपमानांत जळून धुराची उत्पत्ति करतात. त्यामुळें तंतूंची जाडी कमीकमी होत जात असते. उच्च तपमानांत धूर उत्पन्न करण्याची ही प्रक्रिया अतिशय अनियमितपणें होत असते. त्यामुळें तंतूंचा संपूर्ण नाश होतो आणि ते तुटून जातात. अर्थातच बल्ब जळून निकामी होतो. जर्मन शास्त्रज्ञांनीं नव्या प्रकारचा बल्ब तयार करतांना त्यांत अल्प प्रमाणांत फ्लोरिन गॅस घालण्याची युक्ति योजली. त्यामुळें जळणारे तंतु आपोआप दुरुस्त होतात.

### अमेरिकेच्या व्यापारी धोरणांत बदल

पूर्व युरोपांतील देशांशीं असणाऱ्या अगर होणाऱ्या व्यापारांत व्यावहारिक धोरण स्वीकारण्यांत यावें अशी शिफारस अमेरिकन सरकारनें अमेरिकन काँग्रेसला केली आहे. ह्याबाबत करण्यांत आलेल्या अहवालांत दिलेल्या माहितीप्रमाणें पूर्व युरोपमधील बहुतेक सर्व देश त्यांच्या आर्थिक जीवनाच्या नाड्या रशिआशीं निगडित करण्याच्या विरुद्ध आहेत, इतकेंच नव्हे, तर पश्चिमेंतील देशांशीं व्यापारी संबंध वाढविण्याच्या प्रयत्नांत आहेत. ह्या देशांतील परिस्थितींत झपाट्यानें बदल पडून येत असून त्यांना वळण देण्याची संधि अमेरिकेला मिळण्यासारखी आहे. युगोस्लाव्हिआ व पोलंडनंतर आतां रुमेनिआहि अमेरिकेशीं असलेले व्यापारी संबंध सुधारण्याच्या दृष्टीनें पावलें टाकीत आहे.

### हायकोर्टांमधील कज्जांचे ढीग

निरनिराळ्या राज्यांतील हायकोर्टांत अनिर्णित कज्जांचे ढीग सांचून राहिले आहेत. गेल्या दीड वर्षांत अशा कज्जांची ३२ हजारांनीं वाढ झाली आहे. १९६२ अखेर निकाल न लागलेल्या प्रकरणांची संख्या २ लाख, २१ हजार, ८ शेंवर होती ती १९६४ च्या जूनअखेर २ लाख, ५३ हजार, ८ शेंपर्यंत आली. ह्यापैकी ८३,६१४ प्रकरणें २ वर्षांपेक्षा अधिक काळ कोर्टांत पडून आहेत. सर्वच हायकोर्टांत प्रकरणें तुंबून राहिलीं असलीं तरी अलाहाबाद, पंजाब, कलकत्ता आणि मुंबई येथील हायकोर्टांतून त्यांची गर्दी विशेष वाढली आहे. अलाहाबाद हायकोर्टांतील प्रकरणांची संख्या ११ हजारांनीं वाढली, पंजाबमधील ६ हजारांनीं वाढली आणि कलकत्ता व मुंबई हायकोर्टांतील तुंबलेल्या कज्जांची कामें प्रत्येकीं ४ हजारांनीं वाढलीं. ह्या परिस्थितीचा विचार करण्यासाठीं हायकोर्टांच्या सरन्यायाधीशांची बैठक भरविण्यांत येणार आहे.

### भात सडण्याची मोठी सहकारी गिरणी

अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशनच्या मदतीनें दक्षिण भारतांत तिसवारूर ह्या ठिकाणीं भात सडण्याची एक मोठी सहकारी गिरणी काढण्यांत येणार आहे. गिरणीच्या उभारणीसाठी तांत्रिक सल्ला उपलब्ध व्हावा म्हणून फौंडेशनचा एक प्रतिनिधि तेथें आला आहे. भात गिरणीच्या उभारणीसाठी २७ लाख रुपये खर्च येणार आहे. गिरणीसाठी लागणारी यंत्रसामग्री पुढील महिन्याच्या मध्याच्या सुमारास भारतांत येईल. ती अतिशय आधुनिक तऱ्हेची असेल. गिरणींत तांदुळाचा सांठा करण्यासाठी ७ हजार टन सांठवण होण्याइतकें मोठें गुदाम बांधण्यांत येणार आहे. त्याशिवाय तांदूळ कोरडा करण्यासाठीं यांत्रिक साधनेंहि बसविण्यांत येणार आहेत. आधुनिक पद्धतीची यंत्रसामग्री बसविल्यामुळें तांदुळाच्या उताऱ्यांत ५ ते १० टक्के वाढ होईल असा अंदाज आहे.

### हें गणित समजतें का पाहा

आपल्या पृथ्वीचें वय किती ? ह्या विश्वांत माणसाचा प्रवेश प्रथम कधीं झाला ? इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें निश्चितपणें माहिती होण्याची शक्यता नसतांनाहि अनेक शास्त्रज्ञ आपआपल्या परीनें त्यांचीं उत्तरें शोधीत असतातच. लोकसंख्या-शास्त्रांतील तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर ह्यांच्या मतानें विश्वाची उत्पत्ति १,५०० कोटी वर्षांपूर्वी झालेली आहे. त्यांचा हा अंदाज भूकंपांच्या अभ्यासावर आधारलेला आहे. पृथ्वीचा जन्म सुमारें ४५० कोटी वर्षांपूर्वी झालेला आहे. पृथ्वीवरील पहिली जीवनसृष्टि २५० कोटी वर्षांपूर्वी अवतरली आणि माणसाचें आगमन १०० कोटी वर्षांपूर्वी झालें. ख्रिस्त शकापूर्वी १० लाख वर्षें पृथ्वीवर अवघे १ लाख, २५ हजार मानव भ्रमण करीत असावेत. माणसांची लोकसंख्या २५ कोटी होण्यास पहिलें ख्रिस्तशतक उजाडलें. माणसाचा जन्म प्रथम आफ्रिका खंडांत झाला असावा. प्रजापति माणसाची वाटचाल इतकी दीर्घ आहे.

# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्टें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
**१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,**
**३ तुमचें स्थान कोणतें ?**

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — १, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१
टेलिफोन नं. २५५४७४-७५, २५६२१४ २५४७८३

: विभागीय कचेरी : — महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ८४ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४३ लाख |
| ठेवी | ... | ३५ कोटी १४ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ७५ कोटी २५ लाख |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

: बृहन्मुंबईतील शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

वि. म. जोगळेकर,
जनरल मॅनेजर.

प्रगतिचे ३० वें वर्ष



हे लक्ष्मीचे नवदेवालय
इथे श्रमांचा सुफलित संचय
उद्योगाचे उगमस्थान हे।
सौख्याचे संचित !
इथे हो सर्वांचे स्वागत!

# बँक ऑफ महाराष्ट्र लि

तुमची जिव्हाळ्याची बँक

**आपल्या ९९ शाखांनिशीं तुमच्या सेवेस सिद्ध**


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.